भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र
(दुपार)

जा.क्र.२८५/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक २३/०४/२०१७

**१) मोटारसायकलने जात असता चक्कर येवुन खाली पडल्याने डोक्याला मार लागुन उपचारा दरम्यान मृत्यु . :-**

दिनांक २१/०४/२०१७ चे ०९.३० वा दरम्यान यातील मृतक प्रभा सुखदेव मलेवार वय ४० वर्ष रा. तुमसर ह.मु. नेहरू वार्ड मोहाडी हिला तिची लहान बहीन पुष्पा कारेमोरे रा. नेरी हीचे मरणाचे खबर मृतक हीला मिळाल्यापासुन सारखी रडत होती आणि जेवण वैगेरे काही केलेले नव्हते यातिल मृतक ही आपल्या भाच्याच्या मोटारसायकलने नेरी येथे जात असता तिला चक्कर आल्याने ती मोटारसायकल वरून खाली पडल्याने तिच्या डोक्याला जबर मार लागल्याने तिला औषधोपचारा करिता सा.रू. भंडारा येथे भरती केले असता उपचारा दरम्यान मरण पावल्याने डॉक्टरी मेमो वरून पो.स्टे. भंडारा येथे मर्ग क्र. ००/१७ कलम १७४ जा.फौ. चे कागदपत्र पो.स्टे. ला प्राप्त झाल्याने सरतर्फे फिर्यादी पो.शि लांडगे यांचे रिपोर्ट वरुन पोस्टे वरठी येथे कलम १७४ जाफौ.चा नंबरी मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोउपनि राउत पोलीस स्टेशन वरठी हे करीत आहे

**२) अति प्रमानात मद्यप्राषन केल्याने उपचारा दरम्यान मृत्यु . :-**

दिनांक २२/०४/२०१७ चे ०३.३५ वा दरम्यान यातील मृतक कैलास दशरथ लोखंडे वय ४५ वर्ष रा. येदरबुची याने अति प्रमानात मद्य प्राषन केल्याने त्यास औषधोपचारा करिता सा.रू. भंडारा येथे भरती केले असता उपचारा दरम्यान मरण पावल्याने डॉक्टरी मेमो वरून पो.स्टे. भंडारा येथे मर्ग क्र. ००/१७ कलम १७४ जा.फौ. चे कागदपत्र पो.स्टे. ला प्राप्त झाल्याने सरतर्फे फिर्यादी पोहवा. बिनझाडे यांचे रिपोर्ट वरुन पोस्टे गोबरवाही येथे कलम १७४ जाफौ.चा नंबरी मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास स.फौ. मेश्राम पोलीस स्टेशन गोबरवाही हे करीत आहे

**३) शेतात नॉयलान दोरीने गळफास लावुन मृत्यु . :-**

दिनांक २२/०४/२०१७ चे ०९.३० वा दरम्यान यातील मृतक रजनिकांत रमेश पिहींदे वय २६ वर्ष रा. पारडी हा शेतावर गेला असता दुपारपर्यंत घरी परत आला नाही. त्यावरून मृतकचे वडील हे आपले शेतावर गेले असता शेतातील मोहाचे झाडाला मृतक हा नॉयलान दोरीने गळफास लावलेल्या अवस्थेत दिसुन आल्याने फिर्यादी माधवराव शालीकराम पिहींदे वय ३६ वर्ष रा. पारडी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोस्टे दिघोरी येथे कलम १७४ जाफौ. चा मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा तलमले पोलीस स्टेशन दिघोरी हे करीत आहे

४) अल्पवयीन मुलाला पळवुन नेल्याने गुन्हा नोंद . :–

दिनांक २६/३/१७ चे १६.०० वा. दरम्यान यातिल फिर्यादीचा अल्पवयीन मुलगा प्रणय आकाश दहीवले वय १५ वर्ष हा दि.२६/३/१७ चे १६.०० वा. घरून खेळण्याकरिता गेला असता अजुन पर्यत परत आला नाही त्याचे रिश्तेदारीत व मित्राकडे शोध घेतला मिळुन आला नाही. त्याला कोणीतरी अज्ञात इसमाने अपहरण केले आहे. अशा फिर्यादी श्रीमती प्रिया प्रकाश दहीवले वय ३७ वर्ष रा. विठोबा नगर तुमसर यांचे लेखी रिपोर्ट वरून व शासन परिपत्रक क्र.सीआरटी ९१२/ प्र.क्र. ५४/पोल– १३ गृहविभाग मुंबई दि. १०.११.२०१४ अन्वये पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम ३६३ भादवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. गोंडाने पोलीस स्टेशन तुमसर हे करीत आहेत.

५) सार्वजनिक ठिकाणी धोकादायक रित्या व वाहतुकीस अडथळा निर्माण होईल अश्या स्थितीत वाहन उभे करून ठेवल्याने गुन्हा नोंद:–

दिनांक २२/०४/०१७ चे ११.३० वा. दर. यातील आरोपी चालकाने आपल्या ताब्यातील वाहन आमरोडवर उभे करून येणाऱ्या जाणाऱ्या लोकांना व वाहणांना अडथळा होईल अशा स्थितीत उभी करून मिळुन आल्याने सरतर्फे फिर्यादी पोना. खडसे पो.स्टे. साकोली यांचे रिपोर्ट वरून पो.स्टे. साकोली येथे कलम २८३ भादंवि अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. खडसे पो.स्टे. साकोली हे करीत आहेत.

६) अवैध दारु अड्डयावर धाडी . :–

दिनांक २२/०४/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोस्टे भंडारा, कारधा,करडी,तुमसर, गोबरवाही,साकोली,पवनी,अडयाळ येथे अवैध दारु अंडयावर धाडी घालुन एकुण ११ गुन्हे दाखल करून आरोपींच्या ताब्यातुन १४० लिटर हा.भ.दारू + ९२८ के. जी. सडवा मोहा किंमती ३९,७९०/–रु, ०७ लिटर २०० मीलीलीटर देशी/विदेशी दारू किंमती २,३५४/रू. असा एकुण किंमती ४२,१४४/–रु. चा माल जप्त करण्यात आला आहे.

७) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :–

दिनांक २२/०४/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुन ५७ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून अवैध प्रवासी ०३, तीन सिटर वाहनांवरती ०५ केसेस व तसेच ईतर वाहनांवरती ४९ केसेस करण्यात आलेल्या आहेत.

(एस. व्ही. कुलकर्णी )
पोलीस उपअधिक्षक (गृह)
भंडारा करिता
दुरध्वनी.क्र.९९८७३८५४०५

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.